स्थापना दि. १७-२-१९४६ ।।श्री कृष्ण प्रसन्न।। (नोंदणी क्र. अे-२११५-मुंबई)

# महाराष्ट्रीय यादव चॅरिटी ट्रस्ट

मुख्य कार्यालय : श्रीकृष्ण मंदिर सभागृह, सदानंद जाधव मार्ग, नायगांव, दादर(पूर्व), मुंबई - ४०००१४.
दूरध्वनी : २४१६९०४७ / ८३६९३९९५३१ Email : myctmumbai@gmail.com Website : www.myctin.com

जिल्हा शाखा : पुणे, सिंधुदुर्ग, ठाणे  पालघर जिल्हा : वसई-विरार

रत्नागिरी जिल्हा : दापोली, चिपळूण, खेड, मंडणगड, संगमेश्वर, गुहागर, लांजा, राजापूर

कोल्हापूर जिल्हा : कोल्हापूर शहर, शाहुवाडी, पन्हाळा, भुदरगड, गगनबावडा, हातकणंगले (इचलकरंजी)

रायगड जिल्हा : खालापूर, श्रीवर्धन, म्हसळा, माणगांव-रोहा, तळा, महाड-पोलादपूर, मुरूड

## ७८ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना

सप्रेम नमस्कार,

आपणास कळविण्यात येते की , **महाराष्ट्रीय यादव चॅरिटी ट्रस्ट, मुंबई** या संस्थेची सन २०२३-२०२४, **७८ वी वार्षिक सर्वसाधारण सभा, रविवार, दिनांक २९ डिसेंबर २०२४** रोजी, सकाळी ठीक १०.३० वाजता, श्रीकृष्ण मंदिर सभागृह, सदानंद जाधव मार्ग, नायगांव, दादर (पूर्व), मुंबई - ४०० ०१४ येथे ट्रस्टचे **अध्यक्ष मा. श्री. अजय शांताराम बिरवटकर** यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात येणार आहे. तरी सभासदांनी सभेला वेळेवर उपस्थित रहावे ही विनंती.

### सभेच्या कामकाजाचे विषय खालीलप्रमाणे :

१) दिनांक ०३.०३.२०२४ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्तांत वाचून मंजूर करणे.

२) दिनांक १ एप्रिल २०२३ ते ३१ मार्च २०२४ या वार्षिक वर्षाचा विश्वस्त मंडळाने सादर केलेला ७८ वा वार्षिक अहवाल व सनदी लेखापालानी तपासून प्रमाणित केलेला ताळेबंद व नफा-तोटा पत्रकास मंजूरी देणे.

३) सन २०२४-२०२५ या वर्षाचे अंदाज पत्रक मंजूर करणे.

४) वैधानिक लेखा परिक्षकांची नेमणूक करणे व त्यांचा मेहनताना ठरविण्याचा अधिकार विश्वस्त मंडळास देणे.

५) विश्वस्त मंडळाने शिफारस केलेले ठराव मंजूर करणे.

६) संस्थेच्या मुख्य इमारत पुर्नबांधकामाबाबत विचार विनिमय करून धोरणात्मक निर्णय घेणे.

७) संस्थेच्या शैक्षणिक व आपद्ग्रस्त धोरणांवर चर्चा करून सुधारित धोरण ठरविणे.

८) संस्थेच्या माध्यमातून होत असलेल्या जनगणनेचा आढावा घेणे.

९) संस्थेच्या सभासद यादी मधील सभासदत्व रद्द झालेले, तसेच मयत सभासदांची नांवे कमी करून अद्यावत सभासदांची यादी तयार करण्यास मंजुरी घेणे.

१०) मा. अध्यक्षांच्या परवानगीने येणारे इतर विषय.

**विश्वस्त मंडळाच्या आदेशानुसार**
श्री. उदय दगडू पाटील
सरचिटणीस
श्री. प्रकाश रमेश गवळी
सहचिटणीस

स्थळ : मुंबई.
दिनांक : ०१/१२/२०२४

**सभासदांना सूचना :**

१. गणसंख्येअभावी सभा तहकूब झाल्यास, अर्ध्या तासानंतर सदर सभा त्याच ठिकाणी पुन्हा घेण्यात येईल व त्या सभेस गणसंख्येचे बंधन असणार नाही.

२. कोणत्याही सभासदास सभेच्या वेळी एखादा ठराव आणावयाचा असल्यास किंवा ताळेबंद, नफा-तोटा पत्रक, अंदाजपत्रक या संदर्भात प्रश्न विचारावयाचे असल्यास, लेखी प्रश्न, ठराव उपरोक्त सभा तारखेच्या किमान सात दिवस अगोदर ट्रस्ट मुख्य कार्यालयात अवगत करावे व त्याची पोहोच घ्यावी. त्यानंतर आयत्यावेळी आलेल्या प्रश्नांचा अगर ठरावांचा विचार केला जाणार नाही.

३. सन २०२३-२०२४ चा वार्षिक अहवाल सभासदांसाठी ट्रस्टच्या www.myctin.com या संकेतस्थळी (वेबसाईटवर) उपलब्ध आहे. छापील अहवालासाठी मुख्य कार्यालय, मुंबई येथे व शाखा ठिकाणी संपर्क साधावा.

४. सर्व सभासदांना सूचित करण्यात येते की , आपल्या पत्त्यातील बदल किंवा नवीन पत्ता, त्याचबरोबर मोबाईल नंबर व ई-मेल आयडी ट्रस्टच्या कार्यालयात ई-मेल द्वारे त्वरीत पाठविण्यात यावे.

**विशेष सूचना :** सभासदानी सभेला येताना सोबत ओळखपत्र, आधारकार्ड आवश्य घेऊन येणे.

**अंन्तर्देशीय पत्र कार्ड INLAND LETTER CARD**

**PRIVATE & CONFIDENTIAL**
*(TO BE OPENED BY ADDRESSEE ONLY)*

*If undelivered please return to:*


# महाराष्ट्रीय यादव चॅरिटी ट्रस्ट

**मुख्य कार्यालय : श्रीकृष्ण मंदिर सभागृह, सदानंद जाधव मार्ग, नायगांव, दादर (पूर्व), मुंबई - ४०००१४.**

**दूरध्वनी : २४१६९०४७ / ८३६९३९९५३१**

Email : myctmumbai@gmail.com   Website : www.myctin.com


## महाराष्ट्रीय यादव चॅरिटी ट्रस्टचे सामाजिक उपक्रम

| | | |
|---|---|---|
| **शिष्यवृत्ती** | - | इ. ७ वी ते १० वी व १२वी शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती दिली जाते. |
| **शैक्षणिक पारितोषिक** | - | समाजातील शिक्षणप्रेमी व दानशूर व्यक्तिंकडून ट्रस्टला दिलेल्या देणगीतून इ. ८ वी ते १० वी व १२ वी पर्यंत विद्यार्थ्यांना दरवर्षी शैक्षणिक पारितोषिक दिली जातात. पदवीधर (सर्व शाखा), एम.एस.सी.एम.कॉम., एम.ए., इंजिनिअरिंग पदवी/पदविका, एम.एम.एस., एम.बी.बी.एस., सी.ए., डॉक्टर, वकील, सनदी लेखापाल, कला व क्रीडा पारितोषिक मिळविणाऱ्या, तसेच सामाजिक, शैक्षणिक, राजकीय, कला, क्रीडा क्षेत्रात विशेष प्राविण्य प्राप्त केलेल्या समाज बांधवांचा यथोच्छ गौरव करण्यात येतो. |
| **आपदग्रस्त निधी** | - | औषधोपचार व शस्त्रक्रिया इत्यादिसाठी आर्थिक मदत ट्रस्टच्या वतीने केली जाते. |
| **सामुहिक विवाह सोहळा** | - | समाजातील तरुण-तरुणींसाठी ट्रस्टच्या विवाह मंडळातर्फे विवाह नोंदणी केली जाते व इच्छूक वधु-वरांच्या सामुहिक विवाहाचा खर्च ट्रस्टच्या वतीने केला जातो. |
| **पुस्तक पेढी / वह्या वाटप** | - | स्थानिक/मुंबई इ. ५ वी ते इ. १० वी पर्यंत विद्यार्थ्यांना वह्या वाटप केले जाते. इ. ११ वी ते १५ वी शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्ष संपल्यानंतर पुस्तके परत देणे या अटीवर ट्रस्टच्या वतीने पुस्तके दिली जातात. |

## सभासदांना आग्रहाची विनंती

संस्थेमध्ये दरवर्षी **१) २६ जानेवारी प्रजासत्ताक दिन २) १७ फेब्रुवारी महाराष्ट्र यादव चॅरिटी ट्रस्ट वर्धापन दिन ३) अक्षय्यतृतीयेला सामुहिक विवाह सोहळा आयोजित करण्यात येतो ४) १५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिन ५) गोकुळाष्टमी ६) दसरा संमेलन** इत्यादी कार्यक्रम साजरे होतात. तरी सर्व सभासद व ज्ञाती बांधवांनी कार्यक्रमांना अगत्याने उपस्थित राहावे ही विनंती. सदर कार्यक्रमांच्या पत्रिका ट्रस्टच्या www.myctin.com या संकेतस्थळावर पहावयास मिळतील.